महाराष्ट्र शासन
**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
Email ID : apccfhrmadmn@gmail.com ,**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१**

**ई-मेलव्दारे /स्पिडपोस्टव्दारे**

क्रमांक कक्ष-१०(२)/दोन/प्र.क्र.३६/२०२४-२५/ 1257
नागपूर ४४०००१ दिनांक 20/01/2025

प्रति,
श्री.पंजाब आनंदराव भोकरे,
अध्यक्ष,राज्य सरकारी चतुर्थ श्रेणी वन कर्मचारी
संघ नागपूर, १० बी हरिकृपा हाऊसिंग सोसायटी
सिमेट रोड, गणेश किराणा दुनाकाजवळ, जयताळा
नागपूर- ४४००३६

विषय :- दिनांक ०१.११.२००५ पुर्वी वन विभागामध्ये रोजंदारीने अनेक वर्षे सेवा केलेल्या मजुरांना सेवेत कायम करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ११.०८.२००४ चे बैठकित घेतलेल्या ठरावानुसार परंतु दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत कायम करण्यात आलेल्या अधिसंख्य पदावरील "वनमजुरांना" जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगीक नियम लागु करणेबाबत.

संदर्भ :-
१) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/दोन/प्र.क्र.१९/२४-२५/५०४, दिनांक १३.०८.२०२४
२) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/दोन/प्र.क्र.४८/२४-२५/१३३, दिनांक ११.१०.२०२४
३) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/दोन/प्र.क्र.३६/२४-२५/१३४, दिनांक ११.१०.२०२४
४) शासन पत्र क्र. एस-३०/२०२४/१०३४/प्र.क्र.१३८/फ-१२, दि.०९.१२.२०२४
५) आपलेकडील जावक क्र. ६/२०२५, दिनांक १४.०१.२०२५

विषयांकित प्रकरणी आपले संदर्भ ०५ चे अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदर पत्रात अधिसंख्य वनमजुर पदावर शासन निर्णय दिनांक १६/१०/२०१२ अन्वये दिनांक ०१/०६/२०१२ पासून शासकिय सेवेत कायम झालेले वनमजूरांना जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगीक नियम लागु करण्यासाठी अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

२. याबाबत या कार्यालयाचे संदर्भ क्र. ०१ ते ०३ अन्वये शासन निर्णय दिनांक १६/१०/२०१२ अन्वये दिनांक ०१/०६/२०१२ पासून शासकिय सेवेत नियमित वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०२४ मधील तरतुदी लागू होतील किंवा कसे या बाबत शासनास मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

३.	त्यावर शासन पत्र दिनांक ०९/१२/२०२४ (संदर्भ- ४) अन्वये सविस्तर सुचना या कार्यालयास प्राप्त झालेला आहेत. सदर पत्राची प्रत यासोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

**सहपत्रः- वरील प्रमाणे**

(गिन्नी सिंह)
उप वनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र. ०२२-२२८७१४९६ Email ID : deskf12.rnf@maharashtra.gov.in

---

क्रमांक: एस-३०/२०२४/१०३४/प्र.क्र.१३८/फ-१२ दि.०९/१२/२०२४

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(वन बल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय :- वन विभागातील अधिसंख्य वनमजूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ लागू करण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्याबाबत.

संदर्भ :- १) शासनपत्र, क्र.एलएपी-२००१/१३२९/प्र.क्र.२४८/फ-९, दि.१७/१०/२००२.
२) सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक, क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दि.२५/०८/२००५.
३) आपल्या कार्यालयाचे क्र.कक्ष-१०(२)/दोन/प्र.क्र.४८/२४-२५/१३३ तसेच कक्ष-१०(२)/दोन/प्र.क्र.३६/२४-२५/१३४, दि.११/१०/२०२४ रोजीचे पत्रे.
४) आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/आस्था/दोन/प्र.क्र.१९/२४-२५/५०४, दि.१३/०८/२०२४.

महोदय,

उपरोक्त विषयांवरील संदर्भाधीन पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे.

२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.३१/०१/१९९६ व दि.१६/१०/२०१२ अन्वये, वन विभागातील १३१२७ वन मजूरांना, अनुक्रमे दि.०१/११/१९९४ व दि.०१/०६/२०१२ पासून अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित करण्यात आले आहे. तथापि, कोल्हापूर येथील ३४ व यवतमाळ येथील १११ वनमजूरांनी सेवेत कायम झाल्याबाबतचा दिनांक हा अनुक्रमे दि.०१/११/१९९४ व दि.०१/०७/२००४ असा गृहीत धरण्यात येवून त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा लाभ लागू करण्याची विनंती सदरहू वन मजूरांनी वन विभागास केलेली आहे. सदरची मागणी ही धोरणात्मक स्वरुपाची असल्याने त्याबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शन करण्याची विनंती आपल्या संदर्भाधीन पत्रांन्वये शासनास करण्यात आलेली आहे.

३. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती :-

i) वन विभागातील रोजंदारीवर कार्यरत मजूरांच्या सेवाशर्ती (Conditions Of Services) वन विभागाने विहित केलेल्या नाहीत (Not Has Been Prescribed). तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.२ नियमाची व्याप्ती (Extent Of Application) मध्ये विहित केलेल्या तरतुदी ह्या वन विभागातील रोजंदारीवर कार्यरत रोजंदारी मजूर यांना लागू ठरत नाहीत. त्यामुळे सदर नियमावलीतील प्र.क्र.५ अर्हताकारी सेवा यासंदर्भातील नियम क्र.३० ते नियम क्र.५९ मधील तरतुदी ह्या वन विभागातील रोजंदारीवर काम केलेल्या मजूरांच्या रोजंदारीवरील सेवेस लागू करता येत नाही.

ii) मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थाई नियुक्त्या नियमित न करण्याबाबत निर्णय दिला असून सर्व पदावरील नियुक्त्या विहित मार्गाने / माध्यमामार्फत केली नसल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याची मागणी मान्य करता येणार नाही, अशा सूचना सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक, दि.२५/०८/२००५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

iii) वन विभागातील रोजंदारी मजूरांना वन विभागाच्या योजनातंर्गत व योजनेत्तर योजनेमधून उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून रोजंदारीची मजूरी देण्यात येते. तसेच, सदरहू रोजंदारी मजूरांना मा. न्यायमुर्ती श्री. कालेलकर सार संग्रहातील तरतुदी लागू ठरत नसल्याने, अशा मजूरांनी धारण केलेले रोजंदारी मजूर पद हे रुपांतरीत अस्थाई आस्थापनेवरील पदामध्ये रुपांतरीत होत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.५७ व त्याखालील टिप १ व २ मधील तरतुदी अधिसंख्य वन मजूर या पदावर नियमित होणाऱ्या रोजंदारी मजूरास लागू ठरत नाहीत. परिणामी अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित होण्यापुर्वी संबंधित रोजंदारी मजूरांनी रोजंदारीवरील मजूर पदावर केलेल्या सेवेपैकी अर्धी सेवा सदरहू नियम क्र.५७ व त्याखालील टिप १ व २ मधील तरतुदीनुसार अर्हताकारी सेवा म्हणून विचारात घेता येत नाही. यासंदर्भात शासन पत्र, दि.१७/१०/२००२ अन्वये मार्गदर्शन करण्यात आले आहे.

iv) दि.०१/११/२००५ पुर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आलेली आहे.

तथापि, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.१६/१०/२०१२ मधील तरतुदी प्रमाणे रोजंदारीवरील वन मजूरांना नियमित करतेवेळी सरळसेवा भरतीप्रमाणे जाहिरात / अधिसूचना प्रक्रिया राबविण्यात आलेली नसल्याने, या शासन निर्णयानुसार नियमित झालेल्या वनमजूरांना वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०२/०२/२०२४ लागू ठरत नाही.

v) वन विभागात दि.३१/०१/१९९६ च्या शासन निर्णयान्वये रोजंदारीवर काम करणाऱ्या वन मजूरांच्या सेवा ह्या दि.०१/११/१९९४ रोजी ज्यांच्या सेवा नियमित झाल्या असे अधिसंख्य वनमजूर ज्यांच्या निवृत्तीच्या तारखेस १० वर्षापेक्षा कमी अर्हताकारी सेवा पुर्ण झाली आहे / होत आहे, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील निवृत्तीवेतनविषयक योजनेचे लाभ अनुज्ञेय ठरणार नाहीत.

तसेच, दि.१६/१०/२०१२ रोजीच्या शासन निर्णयाने रोजंदारीवर काम करणाऱ्या वन मजूरांच्या सेवा ह्या दि.०१/०६/२०१२ पासून नियमित करण्यात आल्या असल्याने सदरहू वनमजूरांना दि.०१/०६/२०१२ पासून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ वगळता अन्य सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू ठरत असल्यामुळे दि.०१/०६/२०१२ रोजी अधिसंख्य वन मजूर म्हणून नियमित होणाऱ्या मजूरांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरते.

आपला,

(संतोष ज. काळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

<u>प्रत-</u>

निवडनस्ती (फ-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक:एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-२५ ऑगस्ट,२००५.

# परिपत्रक

शासकीय, निमशासकीय, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, स्वायत्त संस्था यामधील गट-अ ते ड मधील सरळसेवेच्या कोटयातील नामनिर्देशनाद्वारे भरावयाची पदे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध विभागांनी नियुक्त केलेल्या निवडसमित्या यांच्यामार्फत स्पर्धा परीक्षाद्वारे निवड केलेल्या उमेदवारांमधून भरण्यात येतात. तथापि काही वेळा आयोग पुरस्कृत किंवा निवडसमित्यानी पुरस्कृत केलेले उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे किंवा निवडसूची संपुष्टात आल्यामुळे नियमितरित्या नामनिर्देशनाद्वारे पदे भरणे शक्य होत नाही. तेव्हा तातडीची गरज म्हणून लोकसेवा आयोगाच्या किंवा निवड समित्यांच्या शिफारशीशिवाय काही नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून तीन महिन्याच्या किंवा चार महिन्याच्या तत्वावर तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या केल्या जातात. तथापि अशा तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या विशिष्ट मुदतीनंतर संपुष्टात आणल्या जात नाहीत. त्या दीर्घ काळ चालू राहतात. त्यामुळे असे अस्थायी कर्मचारी सेवेत कायम करण्याची मागणी करतात. त्यांची सदर मागणी मान्य न केल्यास ते न्यायालयात अर्ज दाखल करतात. मात्र संबंधित नियम, आदेश यांचा योग्य आधार घेऊन शासनाची बाजू योग्य रितीने न्यायालयात मांडली जात नाही. तसेच अशा प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश न्यायालयांच्या निदर्शनास आणले जात नाही. सबब अशा प्रकरणात निर्णय शासनाविरुध्द लागतात. परिणामी अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करावे लागते. अनेक प्रकरणात न्यायालयांच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी सेवा प्रवेश नियमातील अटी देखील शिथिल कराव्या लागतात.

२. अशाच एका प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच ए.उमरानी विरुध्द रजिस्ट्रार, को.ऑ.सोसायटीज, तामिळनाडू व इतर या सिव्हिल अपिल क्र.१४१३/२००३ आणि ३७७४-७६, ४४४६, ६४१५-१६, ७२८२, ९८५४, ९९३३, १०२४४-४५/२००३, ४४९५/२००४ आणि ४४७/२००४ या प्रकरणी दिनांक २८ जुलै,२००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्याची सूचना केली होती. त्यास अनुसरुन सदर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयातील संक्षिप्त बाबी खालीलप्रमाणे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत :-

a) Regularisation cannot be mode of recruitment by any State within the meaning of Article 12. It is a settled proposition that the appointment made in violation of the mandatory provision of the statute and in particular ignoring the minimum educational qualification and other qualifications would be wholly illegal and such illegality cannot be cured by taking recourse of regularisation.

b) Those who come by back door should go through that door.

c) Regularisation further cannot be given to the employees whose services are ad-hoc in nature.

d) No regularisation is permissible in exercise of the Statutory power conferred under Article 12 of the Constitution of India when the appointments are in contravention of the statutory rules.

e) No regularisation is permissible in exercise of the statutory power conferred under Article 162 of the Constitution if the appointments have been made in contravention of the statutory rules.

f) It is trite that appointments cannot be made on political considerations and in violation of the Government directions for reduction of establishment expenditure or filling up of vacant posts or creating new posts including regularisation of daily wage employees.

g) There is no scope for regularisation unless the appointments were made on a regular basis.

h) If the employees are appointed for the purpose of a scheme, they do not acquire vested right of continuance after the project is over.

३. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने डॉ.(श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थान शासन सिव्हिल अपिल क्र.७७४४/१९९७ याप्रकरणी दिनांक १८/२/२००३ रोजी पारीत केलेल्या आदेशात देखील स्पष्ट केले आहे की, मूळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. सदर आदेशात आणखी स्पष्ट केले आहे की, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्त केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्षे सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगू शकत नाही.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील दोन्ही निर्णयातील केवळ ठळक बाबी वर नमूद केलेल्या आहेत. अधिक तपशिलाकरीता संबंधितांनी मा.न्यायालयाचा संपूर्ण निकालांचे अवलोकन करावे, असेही सूचित करण्यात येत आहे.

५. सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पाहता सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे. तसेच यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्याय निर्णयांचा संदर्भ देऊन युक्तीवाद करण्याच्या सुचना सरकारी वकीलांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

न. कुमार

(नवीन कुमार)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,

फॅक्स संदेश

क्रमांक:-एलएपी २००१/१३२९/प्र.क्र.२४८/फ-९,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७.१०.२००२

प्रति,

अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(मानव संसाधन, व्यवस्थापन व प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय:-अधिसंख्य पदावर नियमित झालेल्या वनमजूरांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केल्यामुळे निवृत्तीवेतन देण्याबाबत

संदर्भ :-१)आपले पत्र क्र. कक्ष १० (१)/ आस्था/दोन/प्र.क्र.२०२ दि. ३/८/२००१
२)आपले पत्र क्र. कक्ष १० (१)/ आस्था/दोन/प्र.क्र.५९/ ०१-०२/८०/०२-०३ ,दि. २२/४/२००२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्रास अनुलक्षून असे कळविण्यात येते की, दि.३१.१.१९९६ च्या शासन निर्णयान्वये वन विभागातील रोजंदारी मजूरांना दि. १.११.९४ पासून अधिसंख्य पदावर वनमजूर म्हणून नियमित करण्यात आलेले आहे. तसेच या नियमित मजूरांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात आलेले असल्यामुळे सदर मजूरांना ज्या दिनांकापासून "अधिसंख्य" पदावर नियमित करण्यात आले आहे त्या दिनांकापासून व सदर पदे संपुष्टात येईपर्यन्त महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील शासकीय कर्मचाऱ्यास लागू असलेल्या वेतन, रजा, निवृत्तीवेतन , निलंबन, सर्वसाधारण शर्ती, स्थानिक पुरक भत्ता प्रवासभत्ता ई. सर्व तरतूदी लागू राहतील. या मजूरांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केलेले असल्याने त्यांना दिनांक १/११/९४ पासून अधिसंख्य पदावर घेण्यात आले त्या दिनांकापासून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या तरतूदी देखील लागू ठरतात. या अनुषंगाने त्यांना निवृत्ती वेतनाचा लाभ देखील अनुज्ञेय आहे.

२. वन विभागातील रोजंदारी कामगारांना शासन सेवेत नियमित [illegible]पूर्वी ते रोजंदारीवर कार्यरत असतांना त्यांचे वेतन आकस्मिक खर्चातून देण्यात येत [illegible] विविध योजनांतर्गत/योजनेत्तर उपशिर्ष या अंतर्गत "०२ मजूरी" या सविस्तर शिर्षाखाली [illegible] [illegible]लेल्या अनुदानातून त्यांनी रोजंदारीवरील केलेल्या कामाच्या स्वरुपात मजूरी अदा कर[illegible] [illegible]होती. ही बाब लक्षात घेता महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ५७ मधील टिप क्र.१ ही वन विभागातील नियमित मजूरांचे बाबतीत लागू राहणार नाही व त्यामुळे या नियमित मजूरांची रोजंदारीवर केलेल्या कामाची निम्मी सेवा निवृत्ती वेतनासाठी विचारात घेता येणार नाही. कालेलकर कराराच्या तरतूदी फक्त पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागास लागू आहेत. वन

२५ OCT २००२

Scanned with CamScanner

(410)

विभागाला वाटेलवर कायद्यातील तरतुदी लागू झाल्यामुळे वन विभागातील रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित करण्यापूर्वीची रोजंदारीवरील निम्मी सेवा सेवानिवृत्तीसाठी ग्राह्य धरता येणार नाही. या बाबी लक्षात घेता, वन विभागातील रोजंदारी वनमजुरांना ज्या दिनांकापासून नियमित करण्याचा निर्णय झालेला आहे त्या दिनांकापासूनच अधिसंख्य पदांची निर्मिती झाली आहे, हे लक्षात घेता दि.१.११.१९९४ पूर्वीची रोजंदारीवरील निम्मी सेवा निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

(उ.मु.टेंभरे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

Scanned with CamScanner